# प्रेसनोट

दि.११/०४/२०२२

## बारामती तालुका पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथील पोलीस उपनिरीक्षक व खाजगी इसमावर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | बारामती तालुका पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण, गु.र.नं. २०३/२०२२ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम - ७, ७अ, १२ |
| तक्रारदार | पुरूष, वय - २५ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | १) लोकसेवक - विलास अशोक धोत्रे, वय - ३५ वर्षे<br>पद - पोलीस उपनिरीक्षक, नेमणूक - बारामती तालुका पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण<br>२) ऋषिकेश नंदकुमार पतंगे वय - २४ वर्षे, खाजगी इसम |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५०,०००/- ( पन्नास हजार रूपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | १५,०००/- (पंधरा हजार रूपये) |

पडताळणी व सापळा दिनांक :- ०९/०४/२०२२.

ठिकाण :- बारामती तालुका पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण

थोडक्यात माहिती :- बारामती तालुका, पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे दाखल तक्रारी अर्जावरून तक्रारदार यांचेविरूद्ध गुन्हा दाखल न करण्यासाठी ५०,०००/- रूपये लाचेची मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता बारामती तालुका, पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे दाखल तक्रारी अर्जावरून तक्रारदार यांचेविरूद्ध गुन्हा दाखल न करण्यासाठी खाजगी इसम ऋषिकेश पतंगे याने पोलीस उप निरीक्षक विलास धोत्रे याचेकरीता २० हजार रूपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती १५ हजार रूपये लाचेची मागणी करून ती लाच स्वीकारून लोकसेवक विलास धोत्रे याचेकडे दिली त्यावेळी दोघांना रंगेहात ताब्यात घेऊन वरीलप्रमाणे गुन्हा नोंद करून दोघांना अटक करून मा. विशेष न्यायालय, बारामती येथे हजर केले असता न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कस्टडी रिमांड मंजूर केली आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटच्या पोलीस निरीक्षक प्रणेता सांगोलकर तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे – ७८७५३३३३३३    ४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.